## :: आदेश निशाणी क्र.२४ वर ::

१. प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र.६ यांनी कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. सदर अर्जास वादीने अर्जावरच जबाब दिलेला आहे व अर्ज मंजूर करण्यास तीव्र विरोध दर्शविला आहे.

३. अर्ज, त्यावरील म्हणणे, दावा, दाखल कागदपत्रे यांचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचे म्हणणे ऐकले. प्रतिवादी क्र.६ यांना दिनांक १५-३-२०१८ रोजी दाव्याचे समन्सची बजावणी झालेली आहे. त्यानंतर दिनांक २०-३-२०१८ रोजी सदर प्रतिवादी वकीलामार्फत न्यायालयात हजर झालेले आहेत. परंतु त्यांनी मुदतीत कैफियत दाखल केली नाही. प्रतिवादी क्र. ६ यांना कैफियत दाखल करण्याकरीता ६० दिवसांचा विलंब झालेला आहे. अर्जात नमूद केलेली कारणे संयुक्तिक व योग्य वाटत नाहीत. सदर कारणांच्या पुष्टयर्थ कोणतेही दस्त अभिलेखावर दाखल करण्यात आलेले नाहीत. परंतु दाव्याचे स्वरूप पाहता दाव्याचे गुणवत्तेवरील न्यायनिर्णयाकरीता प्रतिवादी क्र.६ यांना त्यांची कैफियत दाखल करण्याची न्यायाचे हिताचे दृष्टिकोनातून संधी देणे आवश्यक असल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. तथापि झालेल्या विलंबाचा खर्च प्रतिवादीवर लादणे आवश्यक आहे. म्हणून खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## :: आदेश ::

१. अर्ज निशाणी क्र.२४ मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.६ यांना कैफियत दाखल करण्याकरीता झालेला ६० दिवसांचा विलंब माफ करण्यात येतो.

३.   प्रतिवादी क्र.६ यांनी सदर अर्जाचा खर्च रू.४,०००/- (रू. चार हजार मात्र) वादीस द्यावा.

पनवेल.                                    (रा. शा. भाकरे)
दिनांक: १३/१२/२०१९        सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, पनवेल.

## :: आदेश निशाणी क.३० वर ::

१. प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क.७ ते ९ यांनी कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. सदर अर्जास वादीने अर्जावरच जबाब दिलेला आहे व अर्ज मंजूर करण्यास तीव्र विरोध दर्शविला आहे.

३. अर्ज, त्यावरील म्हणणे, दावा, दाखल कागदपत्रे यांचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचे म्हणणे ऐकले. प्रतिवादी क.७ ते ९ यांना दिनांक १६-३-२०१८ रोजी दाव्याचे समन्सची बजावणी झालेली आहे. त्यानंतर दिनांक २०-३-२०१८ रोजी सदर प्रतिवादी वकीलामार्फत न्यायालयात हजर झालेले आहेत. परंतु त्यांनी मुदतीत कैफियत दाखल केली नाही. प्रतिवादी क. ७ ते ९ यांना कैफियत दाखल करण्याकरीता २९० दिवसांचा विलंब झालेला आहे. अर्जदारांच्या म्हणण्याप्रमाणे प्रतिवादी क.९ चे आईवडील दि. २८-४-२०१८ आणि १४-५-२०१८ रोजी मयत झालेले असल्यामुळे सदर प्रतिवादींमध्ये वकीलांची नेमणूक करण्याकरीता समन्वय होवू शकला नाही. परंतु सदर प्रतिवादी हे दिनांक २०-३-२०१८ रोजी वकीलांमार्फत हजर झाल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर प्रतिवादींमध्ये वकीलांची नेमणूक करण्याकरीता समन्वय झाला नाही या म्हणण्यात कोणतेही तथ्य दिसून येत नाही. याशिवाय प्रतिवादी क.७ व ८ यांना मुदतीत कैफियत दाखल करण्याकामी कोणताही अडथळा होता असे दिसून येत नाही. त्यामुळे अर्जात नमूद केलेली कारणे संयुक्तिक व योग्य वाटत नाहीत. परंतु दाव्याचे स्वरूप पाहता दाव्याचे गुणवत्तेवरील न्यायनिर्णयाकरीता प्रतिवादी क.७ ते ९ यांना त्यांची कैफियत दाखल करण्याची न्यायाचे हिताचे दृष्टिकोनातून संधी देणे आवश्यक असल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र

आहे. तथापि झालेल्या विलंबाचा खर्च प्रतिवादींवर लादणे आवश्यक आहे. म्हणून खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## :: आदेश ::

१. अर्ज निशाणी क्र.३० मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.७ ते ९ यांना कैफियत दाखल करण्याकरीता झालेला २९० दिवसांचा विलंब माफ करण्यात येतो.

३. प्रतिवादी क्र.७ ते ९ यांनी सदर अर्जाचा खर्च रू.९,०००/- (रू. नऊ हजार मात्र) वादीस द्यावा.

पनवेल. (रा. शा. भाकरे)
दिनांकः १३/१२/२०१९ सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, पनवेल.